**ठळक बातम्या**

- निवडणूक रोख्यांचे खरेदीदार, अनुक्रमांक आणि रोखीकरण करणाऱ्या राजकीय पक्षांची माहिती निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध

- दिल्ली उच्च न्यायालयानं अटकेपासून संरक्षण द्यायला नकार दिल्यानंतर ईडीचं पथक दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या घरी दाखल

- लोकसभा निवडणूक निःपक्षपाती आणि भयमुक्त वातावरणात करण्याचं काँग्रेसचं आवाहन

- परदेशी ऑनलाईन बेटिंग किंवा गेमिंग प्लॅटफॉर्मच्या जाहिराती न करण्याच्या माहिती आणि प्रसारण खात्याच्या प्रभावशाली व्यक्तींना सूचना

**आणि**

- चेन्नई सुपर किंग्ज संघाचं कर्णधारपद महेंद्र सिंग धोनीकडून ऋतुराज गायकवाडकडे

**<><><><><><>**

निवडणूक रोखे प्रकरणी स्टेट बँकेनं आज सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्रक दाखल केलं. निवडणूक रोख्यांबाबतची अनुक्रमांकासह सर्व माहिती आपण निवडणूक आयोगाला दिली असल्याचं स्टेट बँकेनं या प्रतिज्ञापत्रकात म्हटलं आहे. याबाबत गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयानं स्टेट बँकेला आदेश दिले होते. स्टेट बँकेनं दिलेली माहिती २ फाइलमध्ये निवडणूक आयोगानं वेबसाइटवर टाकली आहे. एका फाइलमध्ये खरेदीदाराचं नाव, दिनांक, रोख्याचा अनुक्रमांक ही माहिती आहे.

दुसऱ्या फाइलमध्ये राजकीय पक्षाचं नाव, रोख्याचा अनुक्रमांक, रोखीकरणाचा दिनांक इ. माहिती आहे.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीबाबत नवीन कायद्याला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या कायद्याच्या आधारे ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू या दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक झाल्यानंतर त्याला आव्हान देणारी याचिका दाखल झाली होती. ती न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्त यांच्या खंडपीठाने फेटाळली. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर या कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती देता येणार नाही असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या पत्रसूचना कार्यालयाअंतर्गत फॅक्टचेक कक्ष स्थापन करणाऱ्या अधिसूचनेला सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. अफवा रोखण्यासाठी केंद्रसरकारच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने फॅक्टचेक कक्षाची स्थापना केली होती. त्याला आव्हान देणारी याचिका विनोदवीर कुणाल कामरा आणि एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया ने मुंबई उच्च न्यायलयात दाखल केली आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत या अधिसूचनेला स्थगिती देण्याची मागणी याचिकेत केली होती ती उच्च न्यायलयाने ११ मार्च रोजी नाकारली. त्याविरुद्ध याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील पीठाने हे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित असेपर्यंत अधिसूचनेला स्थगिती दिली.

**<><><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयाचं पथक थोड्याचवेळापूर्वी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या घरी पोहोचलं. दिल्ली उत्पादन शुल्क धोरण कथित घोटाळ्याप्रकरणी सक्त वसुली संचालनालयानं त्यांना नवव्यांदा समन्स पाठवलं असून आजच त्यांना हजर राहायला सांगितलं होतं. त्याविरोधात केजरीवाल यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर केजरीवाल यांना अटकेपासून संरक्षण द्यायला दिल्ली उच्च न्यायालयानं आज नकार दिला होता.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणूक निःपक्षपाती आणि भयमुक्त वातावरणात व्हावी असं आवाहन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी देशातल्या संवैधानिक संस्थांना केलं आहे. नवी दिल्ली इथं आज ते पत्रकार परिषदेत बोलत होते. १९९४- ९५ ची कर थकबाकी चुकती करण्याच्या नोटिसा काँग्रेसला आत्ता बजावण्यात आल्या आहेत, दुसरीकडे काँग्रेसची खाती गोठवली आहेत असं त्यांनी सांगितलं. एकूण काँग्रेसला निवडणूक लढवता येऊ नये याकरता विविध यंत्रणांचा वापर करुन त्रास दिला जात आहे असा आरोप त्यांनी केला. लोकशाहीचं रक्षण करण्याच्या दृष्टीनं निवडणूक समान पातळीवर लढण्याची संधी काँग्रेसला मिळावी असं आवाहन खरगे यांनी केलं.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टिनं आज तमिळनाडू मधील ९ लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर केली. माजी राज्यपाल तमिलसाई सौंदरराजन यांना चेन्नई दक्षिण मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली असून केंद्रीय मंत्री डॉ. एल मुरुगन यांना निलगिरी राखीव मतदार संघातून तिकिट देण्यात आलं आहे. प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांना कोईंबतूर मधून उमेदवारी देण्यात आली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग यांंनी आज उधमपूर लोकसभा मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. कटुआ इथं उमेदवारी अर्ज भरतांना त्यांच्याबरोबर केद्रीय जलशक्ती मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांच्यासह पक्षाचे अनेक नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

अरुणाचल प्रदेशमधल्या विधानसभा निवडणुकीसाठी ३४ उमेदवारांची नावं काँग्रेसने जाहीर केली आहेत. अरुणाचल प्रदेशमधे लोकसभा निवडणुकांबरोबरच विधानसभेच्या ६० जागांसाठी देखील येत्या १९ एप्रिलला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज पश्चिम बंगालमधील चार जिल्हाधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. पूर्बा मेदिनीपुर, झारग्राम, पुर्णा बर्धमान आणि बिरभुम या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याना हटवण्यात आलं असून ते थेट आयएएस कॅडर मधून नव्हे तर पदोन्नतीवर जिल्हाधिकारी पदावर असल्यानं त्यांना हटवण्यात येत असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयसिस या दहशतवादी संघटनेच्या भिवंडी जवळच्या बोरिवली-पडघा इथल्या शाखेला उद्ध्वस्त केल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेनं तिघांविरोधात आज नवी दिल्लीतल्या विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केलं. देशविरोधी कृत्य केल्याचा ठपका त्यांच्यावर NIA नं ठेवला आहे.

**<><><><><>**

समाजमाध्यमांवर कार्यरत असलेल्या प्रभावशाली व्यक्तींनी परदेशी ऑनलाईन बेटिंंग किंवा गेमिंग प्लॅटफॉर्मच्या जाहिराती करु नयेतं अशा सूचना माहिती आणि प्रसारण खात्यानं केल्या आहेत. ऑनलाईन बेटिंग आणि जुगाराच्या ग्राहकांमध्ये आणि खास करुन तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून आलेल्या सामाजिक आर्थिक गुंतागुतीमुळे या सूचना करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारच्या थेट किंवा अप्रत्यक्ष जाहिरातींविरोधात कठोर कारवाई करणार असल्याचंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पतंजली कंपनीच्या उत्पादनांच्या जाहिरातींमधून ग्राहकांची दिशाभूल करणारे दावे केल्या प्रकरणी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी आज सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी मागितली. न्यायालयानं पतंजलीचे संस्थापक रामदेव बाबा आणि आचार्य बाळकृष्ण यांना २ एप्रिल रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर कंपनीनं आज या प्रकरणी बिनशर्त माफीचं प्रतिज्ञापत्र सादर केलं. भविष्यात अशा जाहिराती दिल्या जाणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल असं यात म्हटलं आहे.

गेल्या २७ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयानं पतंजली आयुर्वेद कंपनीच्या रक्तदाब, मधुमेह, संधिवात, दमा आणि लठ्ठपणा यांसारख्या आजारांवरच्या औषधांच्या जाहिरातींवर बंदी घातली होती. न्यायालयानं पतंजली आयुर्वेद आणि आचार्य बाळकृष्ण यांच्याविरुद्ध अवमानाची नोटीसही बजावली आहे.

**<><><><><>**

महाविकास आघाडीची जागा वाटपावर चर्चा झाली असून वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पक्ष, माकपा या मित्रपक्षांशी बोलणी झालेली आहेत, असं काँग्रेसचे

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितल. कॉँग्रेस पक्षाचे उमेदवारही जवळपास निश्चित झाले असून जागावाटप आणि उमेदवार दोन-तीन दिवसात जाहीर होतील, असं ते म्हणाले. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी आज सकाळी चर्चा झाली. शिवसेनेकडून खासदार संजय राऊतही यावेळी उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीशी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बोलणी केली. जागा वाटपाबरोबर प्रचार सभा आणि इतर मुद्द्यांवरही यावेळी चर्चा झाल्याचं पटोले यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात महायुतीमध्ये जागावाटपाबद्दलची चर्चा आता अंतिम टप्प्यात असून योग्य वेळ आल्याबरोबर निर्णय घोषित केला जाईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्यात महायुतीच्या अधिकाधिक जागा निवडून याव्यात यासाठीचा आढावा आज शिवसेनेच्या आढावा बैठकीत घेण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

अमेरिकन फेडरल रिझर्व्हने व्याजदरात कपात करण्याचे संकेत दिल्यानं सोन्याच्या दरांनं नवा उच्चांक गाठला आहे. २४ कॅरेट सोन्याचे दर कालच्या तुलनेत सुमारे साडे बाराशे रुपयांनी वधारून आज ६७ हजारांच्या जवळ पोहोचले. चांदीचे दरात दिवसभरात दीडहजार रुपयांची वाढ झाली आणि चांदी ७५ हजार रुपयांच्या पलीकडे गेली. फेडरल रिझर्व्हनं व्याजदर कपात करण्याचा निर्णय घेतला त्याचा सकारात्मक परिणाम देशातल्या शेअर बाजारांवरही झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ५४० अंकांची वाढ झाली, आणि तो ७२ हजार

६४१अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १७३ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार १२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><><>**

उद्यापासून सुरु होणाऱ्या १७ व्या आय़पीएल क्रिकेट स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर महेंद्र सिंग धोनीनं चेन्नई सुपर किंग्ज संघाचं कर्णधारपद सोडलं असून, ते ऋतुराज गायकवाडकडे सोपवलं आहे. या स्पर्धेच्या पहिल्या २ आठवड्यांचं वेळापत्रक भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं जाहीर केलं आहे. त्यानुसार सलामीचा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात होणार आहे. उद्या रात्री ८ वाजता चेन्नईतल्या एम ए चिदंबरम स्टेडिअमवर हा सामना सुरु होईल.

**<><><><><><>**

व्हिएतनामचे अध्यक्ष थुआँग यांनी राजीनामा दिला असून, व्हिएतनामी कम्युनिस्ट पक्षानं त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. पक्षाच्या सदस्यांना ज्या गोष्टी करायची परवानगी नसते त्या करुन थुआँग यांनी पक्षाच्या नियमांचं उल्लंघन केलं आहे, असं कम्युनिस्ट सरकारनं म्हटलं आहे.

**//<><><><><><>//**